गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

वर्ष २ रे | अंक ८५ वा | सोमवार १२ ऑगस्ट २०२४ | पाने ४ | किंमत ४ रु/-
| * Volume 2 | Issue 85 | Date : 12/08/2024 | blow Monday | Page 4 Price 4

## शेअर मार्केटमध्ये रिस्क! हिंडेनबर्ग प्रकरणावरून राहुल गांधींचा सवाल

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

नवी दिल्ली : हिंडेनबर्ग रिसर्चने गेल्या वर्षी अदाणी समूहावर गंभीर आरोप केले होते. हिंडेनबर्गने अहवालाद्वारे केलेल्या आरोपांचा परिणाम त्यानंतर अदाणी समूहातील कंपन्यांच्या शेअर्सवर झाला होता. यानंतर आता हिंडेनबर्ग रिसर्चने पुन्हा एकदा भारतात काहीतरी घडणार असल्याचा दावा करत शनिवारी (दि.१०) आपला नवीन अहवाल सादर केला. यामध्ये सेबीच्या अध्यक्षा माधवी पुरी बुच आणि त्यांचे पती या दोघांचे गौतम अदानी यांच्यामध्ये आर्थिक हितसंबंध असल्याचा गंभीर आरोप केला. या आरोपामुळे मोठी खळबळ उडाली.

यानंतर सेबीच्या अध्यक्षा माधवी पुरी बुच यांनी हे सर्व आरोप फेटाळले आहेत. मात्र, तरीही हिंडेनबर्ग रिसर्चने केलेल्या आरोपावरुन आता राजकारण तापलं आहे. यावरून आता लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी हल्लाबोल करत अनेक सवाल उपस्थित केले आहेत. सेबीच्या अध्यक्षा माधवी पुरी बुच यांच्यावरील आरोपांमुळे सेबीची अखंडता धोक्यात आली असून गुंतवणूकदारांनी कष्टाचे पैसे गमावले तर जबाबदार कोण?, असा सवाल राहुल गांधी यांनी केला आहे. राहुल गांधींनी शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये सुरुवातीला त्यांनी क्रिकेट मॅचच्या अंपायरचा उल्लेख केला. त्यामध्ये आंतरराष्ट्रीय सामन्याचे पंच जेव्हा तडजोड करतात, तेव्हा त्या सामन्याचे काय होणार? असा प्रश्न उपस्थित केला आहे.हिंडेनबर्ग रिसर्चने गंभीर आरोप केले, या आरोपानंतर आता माधवी पुरी बुच आणि त्यांचे पती धवल



बुच यांनी स्पष्टीकरण देत एक निवेदन प्रसिद्ध केलं. तसेच हिंडेनबर्गने केलेले आरोप हे बिनबुडाचे असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. हिंडनबर्ग अहवालात नमूद केलेल्या फंडातील गुंतवणूक २०१५ मध्ये करण्यात आली होती. जेव्हा ते सिंगापूरमध्ये वैयक्तिक राहणारे नागरिक होते. तसेच माधबी सेबीमध्ये सहभागी होण्याआधीच ही गुंतवणुकीचा निर्णय मुख्य गुंतवणूक अधिकारी अनिल आहुजा यांच्या प्रभावाखाली घेतला गेला होता. माधबीने सेबीमध्ये सामील होण्याच्या जवळपास २ वर्षे आधीच घेतला गेला, असं म्हटलं आहे. २०१८ मध्ये अनिल आहुजा यांनी सीआयओ पद सोडले, तेव्हा आम्ही त्या फंडातील गुंतवणूकीची पूर्तता केली. तसेच या निवेदनात त्यांनी हिंडेनबर्ग रिसर्चने केलेल्या आरोपात कोणतेही तथ्य नसल्याचे म्हटले आहे.

सेबीच्या प्रमुख आणि अदानी ग्रुपमध्ये आर्थिक हितसंबंध असल्याचा खळबळजनक आरोप हिंडनबर्गने केला आहे. हिंडनबर्गने म्हटले की, माधवी बुच आणि त्यांचे पती धवल बुच यांचे त्याच बर्म्युडा आणि मॉरिशस फंडांमध्ये छुपे हिस्सेदारी होती, । पान २ वर

## लोकसभेप्रमाणे विधानसभा निवडणुकीतही चित्र बदला, शरद पवार यांची शेतकऱ्यांना हाक

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

सोलापूर : देशातील आणि राज्यातील भाजपच्या नेतृत्वाखालील महायुतीचे सरकार शेतकऱ्यांच्या हिताच्या आड येणारे आहे. देशभर सरकारविरोधात शेतकऱ्यांमध्ये रोष वाढला असून, त्याची प्रचिती लोकसभा निवडणुकीत आली आहे. लोकसभेप्रमाणेच आता महाराष्ट्र विधानसभेच्या आगामी निवडणुकीतही चित्र बदलण्यासाठी शेतकऱ्यांनी एकजूट दाखवून सरकार बदलावे, अशी हाक राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी दिली.

बार्शी येथे रविवारी दुपारी झालेल्या शेतकरी संवाद मेळाव्यात पवार बोलत होते. यावेळी पक्षाचे ज्येष्ठ नेते विजयसिंह मोहिते-पाटील, माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, आमदार रोहित



पवार, पक्षाचे जिल्हाध्यक्ष बळीराम साठे आदी उपस्थित होते. मेळाव्याचे संयोजक विश्र्वास बारबोले यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.शरद पवार म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दहा वर्षांपूर्वी सत्तेत येण्यापूर्वी शेतकऱ्यांच्या शेती मालाला उत्पादन खर्चाच्या दुप्पट भाव मिळवून देण्याचे आश्र्वासन दिले होते. परंतु सत्तेत आल्यानंतर मागील दहा वर्षांत शेतीमालाला एकदाही दुप्पट भाव मिळाला नाही, तर उलट, शेतकऱ्यांच्या आत्महत्या पूर्वीपेक्षा दुप्पट झाल्या. सरकारची शेतीविषयक धोरणे हिताआड येणारे आहेत. त्यामुळेच लोकसभा निवडणुकीत ऐतिहासिक निर्णय घेऊन भाजपला त्यांची जागा दाखविली. त्यानंतर आता विधानसभा । पान २ वर

## मराठा आरक्षण प्रश्नावर शरद पवारांनाही विरोध; कुर्डूवाडीत अडवले, बार्शीत घोषणाबाजी, आत्मदहनाचा प्रयत्न

सोलापूर/प्रतिनिधी : मराठा आरक्षणप्रश्र्नी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या पाठोपाठ आता राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनाही मराठा आंदोलकांच्या विरोधाला सामोरे जावे लागत आहे. सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आलेल्या पवारांना अगोदर कुर्डूवाडीजवळ या आंदोलकांनी अडवले. या वेळी त्यांना मराठा आरक्षणप्रश्र्नी भूमिका स्पष्ट करण्याची मागणी त्यांनी केली. यानंतर बार्शीत शेतकरी संवाद मेळाव्यातही पवार हे भाषण करीत असताना या प्रश्र्नावर आंदोलकांकडून पवारांना काळे झेंडे दाखवत घोषणाबाजी करण्यात आली. याच वेळी एका तरुणाने अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला. हा सारा घटनाक्रम पाहता





मराठा आरक्षण प्रश्र्नावर आता पवार यांनाही रोषाला सामोरे जावे लागत असल्याचे दिसून येते.

पवार हे रविवारी बार्शी येथे आयोजित शेतकरी संवाद मेळाव्यासाठी जात असताना कुर्डूवाडीजवळ अंबड (ता. माढा) येथे मराठा आंदोलकांनी त्यांना अडवले. या वेळी त्यांनी पवारांकडे मराठा आरक्षणाबद्दल विचारणा केली. यावेळी पवार यांनी मराठा आरक्षणाला आपला पूर्वीपासूनच पाठिंबा असल्याचे सांगितले मात्र त्यावर आंदोलकांचे समाधान झाले नाही. तुम्ही खूप दिवसांपासून मराठा आरक्षणाला पाठिंबा असल्याचे सांगता. मात्र जाहीरपणे भूमिका स्पष्ट करीत नाहीत, अशा शब्दात या कार्यकर्त्यांनी पवार यांना विचारणा केली. आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून मराठा आरक्षणाबाबत आंदोलने केली जात आहेत, त्याबाबत । पान २ वर

## १७ लाख राज्य सरकारी कर्मचारी जाणार बेमुदत संपावर

मुंबई : महाराष्ट्रातील तब्बल १७ लाख राज्य सरकारी कर्मचारी हे येत्या २९ ऑगस्टपासून बेमुदत संपावर जाणार आहेत. मुबंईत पार पडलेल्या राज्य सरकारी कर्मचारी संघटना कृती समितीच्या बैठकीमध्ये हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीत राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. राज्य सरकारी कर्मचारी संघटना कृती समितीचेमुख्य निमंत्रक विश्वास काटकर यांनी या संपाची माहिती दिली.


महाराष्ट्रातील १७ लाख सरकारी, निम सरकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी २९ ऑगस्टपासून बेमुदत संपावर जातील, असा निर्णय रविवारी मुंबई येथील समन्वय समितीच्या विस्तारीत सभेत झाला. राज्य सरकारने पेन्शनबाबत जे आश्वासन दिले ते अद्याप पाळण्यात आलेले नाही. सामाजिक आणि आर्थिक सुलक्षण म्हणून जुन्या पेन्शनप्रमाणे पेन्शन मिळेल, असे आश्वस्त करुनसुद्धा त्या संदर्भातील नोटीफिकेशन निघू शकलेले नाही. त्यामुळे सर्व कर्मचारी, शिक्षक हे चिंतेत आहेत, असे काटकर म्हणाले. राज्य सरकारने तत्काळ नोटिफिकेशन काढण्याची मागणी कर्मचारी संघटनेकडून करण्यात आली आहे. तसेच नोटिफिकेशन निघत नाही, तोपर्यंत संप सुरु ठेवण्याचा निर्धार संबंधित कर्मचारी संघटनेने केला आहे. आगामी विधानसभा निवडणुकीआधी पुन्हा आचारसंहिता लागू होण्यापूर्वी कोणते निर्णय किती वेळात घेतले जातील, याची साशंकता निर्माण झाली आहे. त्यामुळेच राज्य सरकारी कर्मचारी आणि शिक्षकांची सहनशीलता संपलेली आहे. त्यामुळे त्यांनी २९ ऑगस्टपासून राज्यभरात बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतलेला आहे, अशी माहिती काटकर यांनी दिली.

## अमेरिकेने कट रचून मला सत्तेवरून हटवलं, शेख हसीनांचा मोठा आरोप

नवी दिल्ली : शेख हसीना यांनी बांगलादेशच्या पंतप्रधानपदाचा राजीनामा देऊन देशातून पलायन केलं आहे. त्या सध्या भारतात असून त्यांनी बांगलादेशातील अराजकतेला अमेरिका जबाबदार असल्याचा आरोप केला आहे.

अमेरिकेनेच त्यांना सत्तेवरून पायउतार होण्यास भाग पाडल्याचं वक्तव्य केलं आहे. शेख हसीना यांनी अमेरिकेला सेंट मार्टिन बेट न दिल्यामुळे अमेरिकेने त्यांना सत्तेवरून हटवण्याची योजना आखली होती, असंही हसीना यांनी म्हटलं आहे. बांगलादेशकडून सेंट मार्टिन बेट घेऊन तिथे नौदलाचं व लष्करी तळ उभारण्याची अमेरिकेची योजना होती. ज्याद्वारे अमेरिकेला बंगालच्या उपसागरावर स्वतःचा प्रभाव निर्माण करता आला असता.

अमेरिकेला सेंट मार्टिन बेट हवं होतं, मात्र हसीना यांनी ते दिलं नाही. परिणामी अमेरिकेने त्यांना सत्तेवरून हटवण्यासाठी वेगवेगळ्या राजकीय चाली खेळल्या आणि त्यात ते यशस्वी झाले, असं शेख हसीना यांनी त्यांच्या निकटवर्तीयांच्या माध्यमातून पाठवलेल्या संदेशात म्हटलं आहे. इकोनॉमिक टाईम्सने हसीना यांचा हा संदेश प्रसिद्ध केला आहे.शिक्षण व सरकारी नोकऱ्यांमधील आरक्षणाच्या मुद्द्यावरून बांगलादेशमध्ये तरुणांनी मोठं आंदोलन उभं केलं आहे. दीड महिन्यापासून हे आंदोलन चालू असून दोन आठवड्यांपूर्वी या आंदोलनाने हिंसक वळण घेतलं. यामुळे बांगलादेशात अराजकता माजली. परिणामी शेख हसीना यांनी ४ ऑगस्ट रोजी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला आणि ५ ऑगस्ट रोजी त्या बांगलादेशी वायूदलाच्या



एका विमानाने भारतात आल्या. भारत सरकारने त्यांना सुरक्षित स्थळी ठेवलं आहे. भारतीय गुप्तचर यंत्रणा बांगलादेशमधील घडामोडी व शेख हसीनांच्या सुरक्षेवर लक्ष ठेवून आहेत.

शेख हसीना यांनी म्हटलं आहे की मला माझ्या देशात मृतदेहांचे खच पाहायचे नव्हते म्हणून मी राजीनामा दिला. काही लोकांना विद्यार्थ्यांच्या मृतदेहांवर पाय ठेवून सत्तेत यायचं होतं, परंतु मी तसं हो दिलं नाही. मी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला. अमेरिका सेंट मार्टिन बेट मिळावं यासाठी प्रयत्न करतेय. मी त्या बेटाचं सार्वभौमत्व सोडलं असतं तर अमेरिका अगदी सहजपणे बंगालच्या उपसागरात त्यांचं वर्चस्व निर्माण करू शकली असती. परंतु, मी तसं होऊ दिलं नाही. मी देशातील जनतेला विनंती करते की काही कट्टरपंती तुमच्यी दिशाभूल करू पाहतायत, तुम्ही त्यांच्या राजकारणाला बळी पडू नका.

## पत्रकार संवाद यात्रेच्या दुसऱ्या टप्याची वृत्तपत्र दिंडीने सुरूवात

### छत्रपती संभाजीनगर येथील क्रांती चौकात १३ ऑगस्ट रोजी होणार

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : लोकशाहीच्या बळकटीसाठी, पत्रकारांच्या न्याय हक्कांसाठी दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रा प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली दि.२८ जुलैपासून सुरू झाली आहे. दुसर्या टप्याची सुरूवात छत्रपती संभाजीनगर येथून १३ ऑगस्ट रोजी वृत्तपत्र दिंडीने होणार आहे. ऐतिहासिक क्रांती चौकातून सकाळी १० वाजता यात्रेला सुरूवात होईल. त्यावेळी वृत्तपत्रे विक्रेते, संपादक, पत्रकार व विविध सामाजिक राजकीय संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत अशी माहिती छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाध्यक्ष डॉ.प्रभु गोरे यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली वृत्तपत्र व पत्रकारांच्या मागण्या सरकारला सांगण्यासाठी आणि राज्यभरातील पत्रकारांच्या विषयावर जनजागृती करण्यासाठी दिक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रा २८ जुलै पासून सुरू झाली आहे. पहिल्या टप्यात विदर्भ, खान्देश, उत्तर महाराष्ट्रातील पंधरापेक्षा अधिक जिल्ह्यातुन या यात्रेने प्रवास केला आहे. पत्रकारांचा आणि विविध सामाजिक संस्थांचे मोठे समर्थन यात्रेला मिळाल्याने पत्रकारांच्या या यात्रेचे वादळ घोंगावू लागले आहे. दुसर्या टप्यातील यात्रेचा शुभारंभ १३ ऑगस्ट रोजी छत्रपती संभाजीनगरमधील ऐतिहासिक क्रांती चौकातून होणार असुन मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, पुणे, कोकण, ठाणे विभागातून ही यात्रा २० ऑगस्ट रोजी मुंबईत मंत्रालयावर जाणार आहे. यावेळी वृत्तपत्र विक्रेत्यांच्या सहभागाने वृत्तपत्र दिंडी निघणार आहे. यावेळी प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्यासह सरचिटणीस डॉ.विश्वास आरोटे, कार्याध्यक्ष प्रविण सपकाळे, राज्य समन्वयक संतोष मानुरकर, विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी उपस्थित राहणार आहेत. तर यावेळी वृत्तपत्र विक्रेता संघाचे पदाधिकारी सदस्य आणि विविध सामाजिक राजकीय संस्थांचे प्रतिनिधी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या शुभारंभाला जास्तीत जास्त पत्रकार व वृत्तपत्र विक्रेत्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाध्यक्ष डॉ.प्रभू गोरे, वर्तमानपत्र विकेता संघटनेचे जिल्हाध्यक्ष नीलेश फाटके, ग्रामीण जिल्हाध्यक्ष शांताराम मगर, उपाध्यक्ष छबूराव ताके, संघटक विलास शिंगी, महानगर अध्यक्ष अनिल सावंत, कोषाध्यक्ष मुकेश मुंदडा, प्रसिद्धी प्रमुख मनोज पाटणी, वर्तमान पत्र विक्रेता संघटनेचे उपाध्यक्ष काकासाहेब मानकापे, सचिव गणेश भोसले, कार्याध्यक्ष शेख फईम, उपाध्यक्ष अण्णासाहेब जगताप, प्रसिद्धी प्रमुख भीमराव वायभट, शिवाजी ढेपले यांनी केले आहे.




### वर्तमानपत्र विक्रेता संघटनेच्या सहभागाने वृत्तपत्र दिंडी

पत्रकार संवाद यात्रेच्या दुसर्या टप्प्याचा शुभारंभ छत्रपती संभाजीनगर वर्तमानपत्र विक्रेता संघटनेच्या सहभागाने वृत्तपत्र दिंडीने होणार आहे. या वृत्तपत्र दिंडीत सर्वच वर्तमानपत्र व इलेक्ट्रॉनिक मीडियाचे संपादक, वृत्तपत्र विक्रेते, पत्रकार, राजकीय पुढारी, सामाजिक कार्यकर्ते, नागरीकांचा सहभाग राहणार आहे.

# संपादकीय

## कोण जबाबदार...

कोचिंग संस्थेच्या बेसमेंटमध्ये अचानक पाणी भरल्यामुळे 'आयएएस'ची तयारी करत असलेल्या तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. परवानगी न घेता बेसमेंटमध्ये अभ्यासिका चालवली जात होती, असे समोर आले. दुर्घटनेनंतर कायदा यंत्रणेच्या सगळ्या संस्था अचानक सक्रिय झालेल्या दिसल्या. आपल्याकडे बोट दाखवले जाईल अशी भीती असलेली प्रत्येक संस्था स्वत:च्या बचावाच्या कामालाही लागली व त्यात काही आश्चर्य नाही. कारवाईची मागणी करत विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू आहे. अशा प्रकारचे कोचिंग क्लास चालवणारे आणि सोशल मीडियावरील स्टार असलेले अन्य शिक्षकही आता सगळ्यांच्या नजरेला खुपू लागले आहेत. कोचिंग सेंटरच्या बेफिकिरीमुळे हे बळी गेले आहेत यात दुमत नाही. त्याचवेळी शिक्षण व्यवस्थेतील उदासीनतेचे आणि अनास्थेचे हे बळी नाहीत का, याचाही विचार आता अवश्य केला पाहिजे. देशात कोणतीही मोठी दुर्घटना घडली की लोक जागे होतात. आंदोलन किंवा निषेधाचे सूर उमटू लागतात. चौकशी समित्यांची नियुक्ती केली जाते. दोषींना कठोर शिक्षा केली जाईल, असे छापील वाक्य ठोकून सरकारही मोकळे होते. थोड्याच दिवसांत या सगळ्यावर पाणी पडते. त्यात मृत्युमुखी पडलेले आणि ती घटनाच नेमकी कशामुळे घडली यांनाही त्यांच्याच मरणाने मरणासाठी सोडून दिले जाते. लोकांचे जीवन तसेच पुढे सुरू राहते आणि चमकणारे चेहरे एक एक करत गायब होतात. हे सगळे झाल्यावर सगळे जण पुन्हा तेथेच येऊन थांबतात जेथे ते ती दुर्घटना घडण्याच्या अगोदर उभे होते. आज सामाजिक स्तरावर अनेक बदल झाले आहेत. अनेक सुविधा आणि संधी युवकांना खुणावत आहेत, तद्वतच विषमता हाही एक मुद्दा आहे. देशात बेरोजगारांची संख्या झपाट्याने वाढत आहे. प्रत्येकाला मोठे व्हायचे आहे, आकाशात भरारी घ्यायची आहे. सर्व प्रकारच्या माध्यमांमुळे आणि त्यातही शिक्षणाचा धंदा करणाऱ्यांनी केलेल्या बेसुमार जाहिरातींमुळे छोट्या छोट्या गावातील मुले मोठ्या शहरांची वाट धरत आहेत. ऐपत नसूनही आपल्या मुलाची वा मुलीची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी आणि स्वत:चे उर्वरित आयुष्य तरी सुखकर होईल अशी अपेक्षा बाळगून पालक पोटाला चिमटा घेऊन मुलांना शहरात पाठवतात. मुलेही परिस्थितीची जाण असल्यामुळे आपले ध्येय डोळ्यासमोर ठेवून कठोर कष्ट घेतात. कारण त्यांना अपयशी होऊन चालणार नसते. मोठ्या शहरात ती जगतात कशी? देशातील विविध शहरे त्यांच्यासाठी सुरक्षित आहेत का?

पान १ वरुन

## शेअर मार्केटमध्ये रिस्क!

ज्यांचा वापर अदाणींनी (आर्थिक गैरव्यवहारांसाठी) केला होता. आम्ही अदाणींच्या भांडवली बाजारातील घोटाळ्याबद्दल १८ महिन्यांपूर्वी अहवाल प्रसिद्ध केला होता. त्याचा तपास करण्यात 'सेबी'ने आश्र्चर्यकारकरित्या उत्साहाचा अभाव दाखवला होता. अदानी घोटाळ्यात वापरल्या गेलेल्या ऑफशोअर संस्थांमध्ये सेबीच्या अध्यक्षांची हिस्सेदारी होती, असं असे आपल्याला काही कागदपत्रांमध्ये दिसत असल्याचं हिंडनबर्गने म्हटलं आहे.

## लोकसभेप्रमाणे विधानसभा ..

निवडणुकीतही असाच निर्णय घ्यायचा आहे. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर शेतकरी यांच्या हिताची जपणूक केली जाईल, असे आश्र्वासन त्यांनी दिले.

यावेळी आमदार रोहित पवार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर जोरदार टीकास्त्र सोडले. राज्यात कमी दरामुळे आणि जास्त उत्पादन खर्चामुळे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना २० हजार कोटींचा फटका सहन करावा लागला. तर कांदा निर्यातबंदीमुळे पाच हजार कोटींचे नुकसान शेतकऱ्यांना सोसावे लागले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कांदा निर्यातबंदीचा मोदी सरकारचा निर्णय चुकीचा होता, अशी कबुली दिली. परंतु अजित पवार यांनी भाजपच्या सोबत जाणे हेच मुळात चुकीचे होते. लाडकी बहीण योजना सरकारने घाई गडबडीत आणली आहे. राज्यात महाविकास आघाडी सत्तेत येणार आहे. त्यानंतर लाडकी बहीण योजना बंद न करता उलट, त्याची व्याप्ती वाढविली जाईल, असेही आश्र्वासन आमदार रोहित पवार यांनी दिले. यावेळी खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांचा शरद पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## मराठा आरक्षण प्रश्नावर शरद

आपल्या पक्षाची भूमिका स्पष्ट करावी. ते लोक आपल्या पक्षाचे आहेत की मराठा आंदोलक आहेत, हेही सांगावे, असाही आग्रह या आंदोलकांनी धरला.

धाराशिवमध्ये नुकताच राज ठाकरे यांना विरोध करणारे मराठा आंदोलक हे राष्ट्रवादी आणि ठाकरे गटाचे होते. तसेच कुर्डूवाडीत विरोध करणारे मराठा आंदोलक हे मनसेचे स्थानिक पदाधिकारी होते. दरम्यान, बार्शी येथे शेतकरी संवाद मेळाव्यात शरद पवार हे भाषण करीत असताना जमावातील काही तरुणांनी अचानकपणे त्यांना काळे झेंडे दाखवून 'एक मराठा-लाख मराठा' अशा घोषणा दिल्या. पोलिसांनी घोषणाबाजी करणाऱ्यांना ताब्यात घेतले. या प्रकारामुळे मेळाव्यात गोंधळ निर्माण झाला. दरम्यान हा प्रकार शांत होईपर्यंत याच वेळी अन्य एका तरुणाने अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला. यामुळे मेळाव्यात पुन्हा गोंधळ उडाला. बाबासाहेब शिवाजी बारकूल (रा. गाडेगाव रोड, बार्शी) असे या तरुणाचे नाव आहे. त्यास पोलिसांनी तात्काळ ताब्यात घेतले. एकूणच मराठा आरक्षणप्रश्र्नी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या पाठोपाठ आता राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनाही मराठा आंदोलकांच्या विरोधाला सामोरे जावे लागत आहे.

# निफाड येथे आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने देशमुख सन्मानित



**दैनिक यश सिद्धी न्यूज**

निफाड/प्रतिनिधी : सहकार महर्षी त्र्यंबकराव घुगे (गुरुजी ) भाग्यश्री पतसंस्था निफाड यांचे कडुन एस . बी . देशमुख यांना जिल्हास्तरीय आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने खासदार भास्कर भगरे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.नुकताच निफाड येथे देवकृपा लॉन्स मध्ये भाग्यश्री पतसंस्था यांच्या १९ व्या वर्धापन दिनानिमित्त गुणवंत विद्यार्थी व आदर्श शिक्षकांचा सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते, याप्रसंगी आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने एस बी देशमुख यांना खासदार भास्कर भगरे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले आहे. उपक्रमशील मुख्याध्यापक म्हणुन जिल्हा व राज्य स्तरावर उत्कृष्ट काम असल्याने त्यांच्या कामाची दखल घेऊन हा पुरस्कार देण्यात आला . या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष आमदार दिलीप बनकर तर प्रमुख वक्ते ह .भ.प . रामकृष्ण महाराज लहवितकर ह .भ.प . संजय महाराज धोंडगे हे होते या वेळी आ .डॉ सुधीर तांबे, मविप्र चे अध्यक्ष डॉ.सुनिल ढीकले ,मा.चेअरमन निफाड सह कारखाना माणिकराव बोरस्ते, निफाड नगरपंचायतचे उपनगराध्यक्ष अनिल पा कुंदे, सरचिटणीस व्हि.एन.नाईक शिक्षण संस्थेचे हेमंत आप्पा धात्रक, मविप्र चे सभापती बाळासाहेब शिरसागर, रमेश आप्पा घुगे, दिगंबर गिते , , तानाजी जायभावे , गुरुनाथ कांदे , संचालक नाफडे केदा नाना आहेर ,डी बी ढोमसे, योगेश* मुरकुटे आदी मान्यवर उपस्थित होते . कोणताही प्रस्ताव न मागवता कामाची प्रत्यक्ष पाहणी करून ह्या पुरस्कारांची निवड करण्यात आली.

आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्व स्तरातून एस बी देशमुख यांचें अभिनंदन केले जात आहे

# रायगड जिल्हा परिषद शाळांना शिक्षण किटचे वितरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज**



ठाणे/मिलिंद जाधव : शैक्षणिक चळवळ अधिक गतिमान होण्यासाठी ओवे गाव, धामोळे गाव आणि इनामपुरी गावातील रायगड जिल्हा परिषद शाळांना झीरो फाउंडेशनच्या सहकार्याने, पार्थ पवार फाउंडेशन आणि खारघर मेडिसिटी हॉस्पिटलच्या मदतीने शिक्षण किटचे वाटप करण्यात आले.. या उपक्रमाचे उद्दीष्ट म्हणजे विद्यार्थ्यांच्या शिक्षण वातावरणाला आवश्यक शैक्षणिक संसाधने प्रदान करणे. प्रत्येक किटमध्ये मुख्य शैक्षणिक साहित्य, पाठ्यपुस्तके, स्टेशनरी आणि इतर शिकण्याच्या साधनांचा समावेश होता, जे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांना समर्थन देण्यासाठी तयार केले गेले होते. वितरण प्रक्रिया काळजीपूर्वक नियोजित केली गेली होती, जेणेकरून प्रत्येक शाळेला वेळेवर आपली निविष्ट सामग्री मिळू शकेल. या वितरणास शक्य करण्यासाठी सर्व स्वयंसेवक आणि भागीदारांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. ही भूमिका या गावातील शैक्षणिक परिणाम सुधारण्यासाठी एक महत्त्वाचा पाऊल आहे, आणि या संसाधनांचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासावर सकारात्मक प्रभाव पाहण्याची आम्ही अपेक्षा करतो असे आयोजकांनी बोलताना सांगितले.

# तालुकास्तरीय बुद्धीबळ स्पर्धेत वैभवी पिसे चे घवघवीत यश

वागदरी/एस.के.गायकवाड : तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत जिल्हा परिषद प्रशालेची विद्यार्थिनी वैभवी विजय पिसे इयत्ता आठवी हिने घवघवीत यश संपादन करून



जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरली आहे.दिनांक ८-८-२०२४ रोजी झालेल्या शालेय तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन श्री श्री रविशंकर विद्यामंदिर अणदुर येथे करण्यात आले होते. यामध्ये तुळजापूर तालुक्यातील २५ शाळेतील इच्छुक खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. यामध्ये १७ वर्षीय वयोगटातील मुले व मुली यांनी आपल्या सहभाग नोंदवला या स्पर्धेमध्ये १७ वर्षे वयोगटातील मुलींमध्ये जिल्हा परिषद प्रशाला जळकोटची विद्यार्थिनी वैभवी विजय पिसे हिने घवघवीत संपादन केल्याने होणाऱ्या जिल्हास्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेत तिची निवड झालेली आहे . या यशाबद्दल शालेय व्यवस्थापन समिती, शाळेचे मुख्याध्यापक प्रदीप तरमोडे सर, संतोष सारणे सर, समाधान पवार सर, जे. बी. शिंदे, गोपाळ बनपट्टे सर यांचे सहकार्य लाभले या यशाबद्दल सर्वांनी तिचे अभिनंदन करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या या कार्याबद्दल तिचे पालक वर्गातून कौतुक केले जात आहे.

# आ. समाधान आवताडे यांच्या हस्ते अकोला येथे विविध विकास कामांचे भूमिपूजन

मंगळवेढा/प्रतिनिधीः तालुक्यातील सावकार अकोला येथे आमदार समाधान आवताडे यांच्या विकास निधीतून मंजूर विविध विकास कामांचे भूमिपूजन समारंभ व नव्याने सुरु करण्यात आलेल्या आठवडा बाजार कार्याचा शुभारंभ आ. समाधान आवताडे यांच्या हस्ते करण्यात आला. ग्रामदैवत श्री.देव काळभैरव नाथाच्या अध्यात्मिक विचारांनी पावन असणाऱ्या या गावातील सकल ग्रामस्थांनी माझ्या राजकीय व सामाजिक नेतृत्वासाठी एकदिलाने प्रेम उभा केले आहे. गावाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आणखी निधीच्या रूपाने आपण या ग्रामस्थांना प्रगतीपथावर ठेवू यांच्या प्रेमाशी बांधील राहू असा मनोदय आ. समाधान आवताडे यांनी व्यक्त केला.यावेळी जिल्हा समितीचे सदस्य प्रदीप खांडेकर, मारापूरचे लोकनियुक्त सरपंच विनायकराव यादव, अकोलाचे लोकनियुक्त सरपंच सौ.सुरेखाताई इंगळे-पाटील, माजी सरपंच माणिक इंगळे-पाटील, जेष्ठ नेते जगन्नाथ इंगळे-पाटील, युवक नेते डॉ. विठ्ठल इंगळे-पाटील, नामदेव इंगळे-पाटील, बाळासाहेब इंगळे-पाटील, अशोक रणदिवे यांचेसह आजी-माजी ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**नशा मुक्त भारत अभियान रॅली**

भारत नशा मुक्त अभियान साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपूरा-मुर्री येथील सर्व विद्यार्थी यांची सामाजिक संदेश देण्यासाठी नंगपूरा-मुर्री गावातील चौकाचौकात शपथ ग्रहण करून रॅली काढण्यात आली. छायाचित्र – मुन्नाभाई नंदागवळी

# तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेची चिखली येथे आढावा बैठक संपन्न..!

बुलढाणा/राहुल साबळे : चिखली येथील शासकिय विश्रामगृह येथे तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेची आढावा बैठक संपन्न सदर मीटिंगमध्ये तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा.संदिपभाऊ गवई यांनी महाराष्ट्रातील सर्व



पदाधिकाऱ्यांना संघटन बांधणी व पुढील नियोजन संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच महाराष्ट्रातील राज्य कार्यकारिणी, कोअर कमिटी व जिल्हाध्यक्ष, तालुका, शहर यांच्या कामांचा आढावा घेऊन त्यांना संघटन अधिक मजबूत व गतिमान करण्या संदर्भात सूचना देखील केल्या. तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा.संदिपभाऊ गवई यांच्या नेतृत्वात मिळणारा प्रचंड प्रतिसाद निश्र्चितच महाराष्ट्र मध्ये देखील बदल घडविणार यावेळी तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा.संदिपभाऊ गवई यांच्या मार्गदर्शनाखाली तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेच्या पुढील कार्यकारिणी मध्ये नवनिर्वाचित पदाधिकारी महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष मा.प्रशांत पचेरवाल, आय टी सेल विभाग (सोशल मिडीया) महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष मा.राधेशाम खरात, मेहकर तालुका अध्यक्ष मा.महेंद्र गवई, तसेच महिला आघाडी महाराष्ट्र प्रदेश सचिव सौ.लक्ष्मीताई कस्तुरे, महाराष्ट्र प्रदेश संघटक सौ.प्रतिभाताई गवई, चिखली तालुका अध्यक्ष सौ.राधाताई यंगड, चिखली तालुका कार्याध्यक्ष सौ.आशाताई कस्तुरे यांच्या निवडी करण्यात आल्या आहे. यावेळी चिखली तालुक्यातील समस्त तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेतील पदाधिकारी व सदस्य तसेच महिला आघाडी पदाधिकारी उपस्थित होते.

# रेवणसिध्देश्वर पालखी सोहळा भक्तिभावात

सोलापूर/प्रतिनिधीः दरवर्षीप्रमाणे श्रावण मासातील प्रत्येक रविवारी जोडभावी पेठ येथून निघणाऱ्या श्री जगद्गुरु रेवणसिद्धेश्वर महाराजांची पालखी सोहळा भक्ती भावात पार पडली. श्री रेवणसिद्धेश्वर मंगल कार्यालय येथे पालखीची मनोभावे पूजन करून जोडभावी पेठ चिद्रे वाडा येथून मिरवणूक मार्गस्थ झाली.

या प्रसंगी सुदीप चाकोते, चन्नवीर चिट्टे, प्राचार्य गजानन धरणे, मल्लिनाथ राचेटी, सिद्धेश्वर दुलंगे, राजेंद्र इंडे, गिरमलप्पा हिंगमिरे, शिवानंद ख्याडे, संतोष घटोळे, चंद्रकांत मुंडे, सागर अतनूरे, मल्लिनाथ सोलापुरे, आशिष दुलंगे, विकी चाकोते, युवराज चाकोते, मनोज पाटील, बाळासाहेब वाघमोडे, बाबुराव अतनूरे, भागेश ख्याडे,चिदानंद बगले आदी उपस्थित होते. पालखी मिरवणूक श्री रेवणसिद्धेश्वर मंगल कार्यालयपासून चिद्रे वाडा, कुंभारवेस, मधला मारुती, गुरुभेट, सात रस्ता मार्गे विजापूर रोड येथील रेणुसिद्धेश्वर मंदिरात आली. मंदिरात आरती होऊन भाविकांसाठी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. ही मिरवणूक पुन्हा सायंकाळी याच मार्गे निघत चिद्रेवाडा येथे सांगता झाली . यावेळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते . ही परंपरा गेली दीडशे वर्षाहून अधिक काळापासून अखंडित चालत आहे. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी रोहित बिद्री, ऋषिकेश हिंगमिरे, मल्लिनाथ कलशेट्टी, शुभम धनशेट्टी, सुरज कोरे, अभिजीत तां व्युडुरे, बंटी वारद, मंथन चिडगुंपी आदींनी परिश्रम घेतले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# इंदापूर–सोनई प्रतिष्ठानच्या वतीने सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळा

## खासदार सुप्रिया सुळे, अमोल कोल्हे , रोहीत पवार यांची प्रमुख उपस्थिती




**दैनिक यशसिद्धी न्यूज**

इंदापुर/अतुल सोनकांबळे : २३ ऑगस्ट रोजी इंदापुरात वाघ पॅलेस या ठिकाणी सामुदाईक विवाह सोहळा घेण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती प्रवीण माने यांनी माहीती दिली.

शनिवारी १० ऑगस्ट रोजी इंदापुरात आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

सोनाई प्रतिष्ठानच्या वतीने यापूर्वी ७५ जोडप्यांचा सामुदायिक विवाह सोहळा संपन्न केला होता हीच परंपरा पुढे चालू ठेवत यंदाच्या वर्षी देखील ५१ जोडप्यांचा विवाह सोहळा पार पाडला जाणार आहे असे प्रवीण माने म्हनाले. २३ ऑगस्ट रोजी सकाळी ९ ते अकरा वाजेपर्यंत हळदीचा कार्यक्रम ११ ते ३ भोजन ३ ते ५ वाजेपर्यंत (वरदवा) व नंतर ५:३० ते ७ पुढील वेळेत खासदार सुप्रिया सुळे, खासदार अमोल कोल्हे,कर्जत जामखेडचे आमदार रोहित पवार सोनाई उद्योग समूहाचे प्रमुख दशरथ माने व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत सामुदाईक विवाह सोहळा पार पडणार आहे.

# रिपाई आठवले गटच्या ता उपाध्यक्षपदी प्रकाश गडगडे यांची निवड



**दैनिक यशसिद्धी न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनीधी :नागणसूर गावचे सुपुत्र मा प्रकाश गडगडे यांची रिपाई आठवले गटाच्या ता उपाध्यक्ष निवड करण्यात आले निवडीचे शुभेच्छा रिपाई प्रदेश अध्यक्ष मा राजाभाऊ सरवदे यांनी हार घालून पुस्प गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी जिल्हा अध्यक्ष सोमनाथ भोसले , जिल्हा सरचिटणीस शामसुंदर गायकवाड , जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी, पश्र्िचम महाराष्ट्र सरचिटणस जितेंद्र बनसोडे,युवक जिल्हा सरचिटणीस विजयकुमार पोतेनवरू,ता अध्यक्ष आविनाश मडिखांबे,शहर अध्यक्ष अजय मुकणार तालुका सरचिटणीस राजू भगळे, युवक तालुका सरचिटणीस तमा धसाडे दिनेश रूही,गोरखनाथ धोडमानी व आदी उपस्थित होते

# औसा तालुक्यातील सारणी गावची दूर अवस्था सारणी गावातील माणसाची दैनिय अवस्था

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

औसा/अमर जाधवः ३० सप्टेंबर १९९३ च्या भूकंपा नंतर भूकंपग्रस्त भागातील गावाची प्रगती चांगल्या प्रकारची झाली असुन तालुक्यातील सारणी गावाकडे दुर्लक्षच ..

सारणी हे गावत ३० सप्टेंबर १९९३ च्या भूकंप नंतर आज तागायत गावातील रस्ते शाळा व मानवी जीवनासाठी उपयुक्त असणाऱ्या सुविधा पासुन आज ही वंचितच आहे. सारणी गावातील नागरिकांनपासुन या सुविधा कोसो दूर आहेत. नवीन सारणी ते जुनी सारणी या ३ किलोमीटरचा गावाला पक्का रस्ता नाही जुन्या सारणी पासून अवघ्या सात किलोमीटर अंतरावर असलेले उस्मानाबाद जिल्ह्यातील माकणी हे गाव पण तो ही रस्ता तसाच अवघ्या सात की मी अंतरावर असून देखील गावातील विद्यार्थ्यांना शाळेला जायला रस्ता नाही जेमतेम लोकसंख्या असलेल्या सारणी या गावाकडे सर्वच राजकीय पुढाऱ्यांनी दुर्लक्ष केले आहे.

गावाला ना धड रस्ता ना दवाखाना इयत्ता ५ पुढील विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी बाहेरगावी जात आसतात रस्ता नसल्याकारणाने विद्यार्थ्यांचे नुकसान होत असून आठ आठ दिवस कॉलेजचे तोंड ही येत नाही. गावातील रस्त्याच्या दुरावस्थेमुळे गावातील सुशिक्षित तरुण बेकार मुलांना लग्ना करिता कोणीही मुली देत नाहीत तर सारणी गावातील बाहेरगावी दिलेल्या मुलींना सासरची मंडळी गावाला रस्ता नसल्याकारणाने मुलींना डिलिव्हरीसाठी माहेरी पाठवत नाहीतसारणी गावातील तरुण आता चौकात कींवा कट्यावर बसुन म्हणतात काट्याकुट्याचा तुडवीत रस्ता माझ्या गावाकडे चल माझ्या दोस्ता असंच काही बडबडतात




शहापूर येथे फुले शाहू आंबेडकर साहित्य महोत्सव निमित्ताने सिने अभिनेते प्रसिद्ध विचारवंत किरण माने दंगल कार कवि व इतर मान्यवर यांचे उपस्थितीत आंबेडकरी साहित्य विचार प्रसारक म्हणुन स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित केले

# मनुष्य सेवाभावीवृत्तीने जगला तरच आनंद मिळतो : माजी मंत्री बसवराज पाटील

## रोटरी क्लब मुरूम सिटी चा पदग्रहण व चार्टर प्रदान सोहळा थाटात




**दैनिक यश सिद्धी न्यूज**

उमरगा/ ता.प्रतिनिधी : जागतिक स्तरावर रोटरीने आपली स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. ही सेवाभावीवृत्ती निश्र्िचतच माणसाला प्रेरणा देणारी आहे. यामुळे मनुष्य मानसिक दृष्ट्या सक्षम बनतो. आज वेळ, ज्ञान व पैसा या बाबी अतिशय महत्त्वाच्या आहेत. त्या देण्यासाठी सर्व रोटरीचे सदस्य प्रयत्न करतात हे महत्वाचे आहे. अशा कार्यामुळे निश्र्िचतच दैवी आनंद प्राप्त झाल्याशिवाय राहत नाही. मनुष्य सेवाभावीवृत्तीने जगला तरच आनंद मिळतो असे प्रतिपादन माजी मंत्री बसवराज पाटील यांनी केले. मुरूम येथील रत्नमाला मंगल कार्यालयात रोटरीचा पदग्रहण समारंभ व चार्टर प्रदान सोहळा आयोजित रविवारी (ता. ११) रोजी अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी राज्यमंत्री बसवराज पाटील होते. प्रमुख अतिथी पदग्रहण अधिकारी माजी प्रांतपाल विष्णू मोंढे, न्यू क्लब अँडव्हायझर दिनकर अरबळे, माजी प्रांतपाल दिपक पोकळे, सहाय्यक प्रांतपाल अजित गोबारे, माजी प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड, रोटरीचे नूतन अध्यक्ष कमलाकर मोटे, नूतन सचिव सुनिल राठोड आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी दीप प्रज्वलन व कुंडीतील रोपट्याला पाणी घालून मान्यवरांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी ज्ञानदान विद्यालयातील होतकरू गरीब विद्यार्थी-विद्यार्थिनींना पाच सायकलच्या चाव्या मान्यवरांच्या हस्ते देण्यात आल्या. याप्रसंगी नूतन सदस्यांचा मान्यवरांच्या हस्ते रोटरीची पिन लावून सत्कार करण्यात आला.

श्रीकांत गायकवाड मार्गदर्शन करताना म्हणाले की, अलीकडील काळात व्यक्तीवादी व स्वकेंद्री मानसिकता वाढत चालल्याने समाज जीवन विस्कळीत होत आहे. सत्ता, संपत्ती व प्रतिष्ठेपासून वंचित असणाऱ्या समाज घटकांचे हित जोपासण्यासाठी रोटरी क्लब सारखी संस्था जगभर कार्य करीत आहे. ते अत्यंत कौतुकास्पद स्वरूपाचे ठरते. गरीबी व बेरोजगारी सारख्या ज्वलंत प्रश्र्नांच्या सोडवणुकीसाठी विविध पातळीवरून समाज कार्य घडवून येणे गरजेचे आहे. संविधानामध्ये ज्या मूलभूत घटनात्मक तरतुदी केल्या आहेत. त्यामुळे आपला देश एकात्म राहू शकला आहे. आपल्या शेजारच्या देशात या ना त्या कारणामुळे अस्थिरता निर्माण होत असलेली दिसून येत आहे.

डॉ. दिपक पोफळे मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, आनंद ही भावना आहे तर समाधान ही वृत्ती. भावना सतत बदलणारी असते; पण वृत्ती कायमस्वरूपी असते. दुःख संपल्यानंतर आपण आनंदी होऊ असे लोकांना वाटत असते; पण आपण आनंदी असाल तर दुःख आपोआप कमी होईल आणि समाधानीवृत्ती ठेवली तर कितीही चांगल्या-वाईट प्रसंगांनंतरही माणूस हा आनंदीच राहील हे निश्र्िचत. माणसाला सुख, शांती, समाधान मिळवायचे असेल तर पराकोटीची निस्वार्थवृत्ती घालवली पाहिजे.

पदग्रहण अधिकारी विष्णू मोंढे यांनी रोटरीत काम करताना जो आनंद मिळतो. तो आनंद इतर दुसऱ्या कुठल्याही कामापेक्षा निश्र्िचतच मोठा असतो. दिनकर अरबळे, अजित गोबारे आदींनी रोटरीच्या कार्यप्रणालीबद्दल मनोगत व्यक्त केले. गोविंद पाटील, डॉ. विजयानंद बिराजदार, डॉ. महेश मोटे, डॉ. महेश स्वामी, शिवशरण वरनाळे, उल्हास घुरघुरे, डॉ. अप्पासाहेब सुर्यवंशी, प्रकाश रोडगे, कल्लय्या स्वामी, डॉ. राजेंद्र पाटील, भूषण पाताळे, मल्लिकार्जुन बदोले, शरणाप्पा धुम्मा, राजेंद्र वाकडे, शिवकुमार स्वामी कलाप्पा पाटील, मुन्ना मुंदडा आदींनी पुढाकार घेतला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. नितीन डागा यांनी केले. सूत्रसंचालन संतोष कांबळे तर आभार सुनिल राठोड यांनी मानले. शहर व परिसरातून बहुसंख्येने नागरिक उपस्थित होते.

# किरीटेश्वर मठात मासिक शिवानुभव गोष्ठी श्रमजीवी वर्गातून लिंगायत धर्माचा उदय : डॉ. गुरुलिंगप्प धबाले




**दैनिक यश सिद्धी न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः बाराव्या शतकात बसवण्णा यांच्या नेतृत्वाखाली वैचारिक भूमिकेतून कष्टकरी आणि बाराबलुतेदार यांच्या सहित श्रमजीवी वर्गातून लिंगायत धर्माचा उदय झाला असे अक्कलकोट खेडगी महाविद्यालयाच्या कन्नड अभ्यास संस्थेचे प्रमुख डॉ.गुरलिंगप्पा धबाले यांनी आपले मत व्यक्त केले जागतिक लिंगायत महासभा, सोलापूर यांनी किरकटेश्र्वर मठाच्या सहकार्याने आयोजित केलेल्या पहिल्या मासिक शिवानुभव गोष्ठी कार्यक्रमात ते बोलत होते.

गुळेदगुड्डा शिवशरण देवरु, जागतिक लिंगायत महासभा राज्य कार्याध्याक्ष्य विजयकुमार हत्तुरे अध्यक्षस्थानी होते. जिल्हाध्यक्ष शिवानंद गोगाव, सोलापूर शहर अध्यक्ष विजयकुमार बावे, महिला अध्यक्षा राजश्री थळगे, जिल्हा युवा शाखेचे अध्यक्ष शिवराज कोटगी आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ. गुरुलिंगप्प धबाले म्हणाले कि आम्ही बसवण्णांचे उपासक आहोत. १२वे शतकात बसवण्णांना लिंगायत धर्माच्या उभारणीची काय गरज होती.? उत्तर भारतातून स्थलांतरित झालेल्या अनेक धर्मांमध्ये बसवण्णा हे स्वतंत्र विचारवंत म्हणून, मानवी मूल्यांच्या पायावर लिंगायत या स्वतंत्र धर्माची उभारणी करून भारताच्या इतिहासात अद्भूत कार्य करणारे आम्ही बसवण्णांचे वारसदार. दया, प्रेम, शांतता समाजातील शोषित कष्टकरी, कारागीर यांचे शोषण रोखण्यासाठी बसवण्णांनि स्वतंत्र लिंगायत धर्माची स्थापन केले. त्यांना आपण कधीही विसरता कामा नये. कितीही जन्म आले तरी बसवण्णांना विसरू नये. सोलापूर जिल्ह्यात जागतिक लिंगायत महासभा उत्तम कार्य करीत असल्याचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे सानिध्य असलेले किरिटेश्र्वर मठाचे श्री .म.नि.प्र स्वामिनाथ महास्वामी बसवण्णा यांनी स्थापन केलेल्या लिंगायत धर्माचे तत्व -सिद्धांत आपले जीवनात आचाराणात आणायचे प्रत्तेक लिंगायत बांधवांचे कर्तव्य आहे. आपण बसवण्णांचे खरे अनुयायी तेव्हाच बनू शकतो जेव्हा आपण त्यांची तत्त्वे आत्मसात करू, जागतिक लिंगायत महासाभाच्या कार्याला आपण सहकार्य करण्याचे त्यांनी सांगितले.

एमके फाऊंडेशनचे संस्थापक महादेव कोगनुरे यांनी दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात केली आणि बसवण्णा यांनी सांगितलेल्या दसोहाच्या संकल्पनेत आपण लोकांसाठी अनेक सामाजिक कामे करत असल्याचा आनंद मला आहे असे सांगितले. जागतिक लिंगायत महासभा खूप चांगले रीतीने काम करीत असून त्याच्या कामाला सर्वतोपारी सहकार्य करण्याचे त्यांनी सांगितले.

शहर उपाध्यक्ष भगवंत उमादी, कोशाद्ध्यक्ष नागेंद्र कोगनुरे, मल्लिनाथ थलांगे, निर्मला कोनापुरे, अमित कलशेट्टी, राजेंद्र खसगी, चन्नवीर भद्रेश्र्वरमठ, चिन्नम्मा बिज्जरगी, वीणा दिडवीर, गुरुबाळ बगले, तेली काका, बसवराज चाकाई, मीनाक्षी बागलकोटे, निर्मला लातुरे, महादेवी तेली, रुप चडचणकर, पार्वती उमादी , मंगला कोनापुरे , इंदुमती हिरेमठ, सविता गोगाव , शशिकला रामपुरे सहित शंकरलिंग महिला मंडळाच्या सदस्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. वागदरी कन्नड शाळेचे पल्लवी, बनशंकरी, साक्षी, पल्लवी, लक्ष्मी, जगदीश मठपती व शशिकला रामपुरे यांनी वचन गायन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजश्री लोकापूर यांनी केले तर तर जागतिक लिंगायत महासभाचे अध्यक्ष शिवानंद गोगाव यांनी आभार मानले.

# पंढरपूर मंगळवेढा विधानसभा लढवण्याचा भैरवनाथ शुगरचे चेअरमन अनिल सावंत यांचा मी लढवणारच

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघात आता भाजप सोबत शिवसेनेने देखील उमेदवारीसाठी दावा टाकला आहे पंढरपूर हा एटीएम मध्ये परंपरागत शिवसेनेचा मतदारसंघ राहिला आहे त्यामुळे या मतदारसंघात आगामी निवडणुका सेनेने लढवावी अशी शिवसेनेची मागणी आहे असे जर झाले तर सध्या सेनेकडून निवडणूक लढवण्यास आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांची पुतणे अनिल सावंत यांचा चेहरा पुढे येऊ लागला आहेअनिल सावंत यांनी मंगळवेढा जवळ असणाऱ्या लवंगी येथील भरण्याची शुगर कारखान्याच्या माध्यमातून मोठा राजकीय घोटाळा जमा केला आहे

सर्व पक्ष कार्यकर्ते आणि सर्वच थरातील नीती व्यक्ती यांच्याशी त्यांचा चांगला ऋणानुबंध आहे अशा स्थितीत अनिल सावंत हे शिवसेनेकडून पंढरपूर विधानसभा मतदारसंघाच्या आमदारकीचा चेहरा म्हणून पुढे येऊ शकतात शिवसेनेकडून यापूर्वी देऊळच नेते आमदार भारत भालके विद्यमान आमदार समाधान आवताडे येताल भगत यांनी निवडणूक लढवली आहे त्यामुळे या मतदारसंघातील गाव गाड्यापर्यंत शिवसेना रुजली आहे अशातच तानाजी सावंत शिवाय सावंत आणि सावंत यांच्या माध्यमातून आरोग्याची वारी देखील नागरिकांपर्यंत पोहोचवली याचा आगामी निवडणुकीत शिवसेनेने निवडणूक लढवली तर अनिल सावंत यांचा फायदा होऊ शकतो



अनिल सावंत यांच्या उमेदवारीची होत असणारी चर्चा या निमित्ताने सावंत यांच्या घरातील काका पुतण्याची नातेपुढे येत आहे आजपर्यंत अनेक काका पुतणे यांची राजकारण पाहिले गेले यामध्ये आता सावंत बंधू यांच्या राजकारणात सोबत आरोग्य मंत्री तानाजी सावंत आणि त्यांची पुतणे अनिल सावंत यांचे राजकारण या निवडणुकीच्या निमित्ताने पुढे येऊन विधानसभेला गवसणी घालणारी ठरू शकतात. माडा तालुक्यातील वाकाव येथील सावंत कुटुंब अकरा वर्षांपूर्वी मंगळवेढा तालुक्यातील लवंगी येथील माळरानावर भैरवनाथ शुगर वरच लिमिटेड या व्यवसायाच्या निमित्ताने लवंगी सारख्या दुष्काळग्रस्त भागांमध्ये साखर कारखान्याची सुरुवात केली व त्या भागांमध्ये असणारे शेतकऱ्यांचा उसाचा प्रश्र्न सोडवला गेला व त्या भागातील हजारो लोकांना रोजगार उपलब्ध करून दिला भैरवनाथ शिवर उद्योग समूहाचे व्हाईस चेअरमन अनिल दादा सावंत हे पंढरपूर मंगळवेढा तालुक्यातील विविध सामाजिक सांस्कृतिक व शैक्षणिक राजकीय कार्यक्रमांमध्ये हिरे यांनी सहभागी होऊन सर्वसामान्य लोकांना मदत करतात गणपती उत्सव देवी उत्सव असे वेगवेगळे उत्सव किंवा आरोग्य शिबिर रक्तदान शिबिर उपस्त्यांचे स्पर्धा भरवतात व भागातील रोडच्या वाहतुकीच्या समस्या याबाबतीत वारंवार त्यांनी अधिकाऱ्यांच्या पाठपुरावा करून त्या भागातील तिथल्या लोकांची सोय करण्याचा प्रयत्न केलेला आहे महाराष्ट्र राज्याचे आरोग्य मंत्री तानाजीराव सावंत व आरोग्य मंत्री झाल्यापासून त्या भागातील बऱ्याच लोकांना वैद्यकीय मदत मिळवून देण्यासाठी अनिल दादा हे सक्रिय असतात आणि पंढरपूर शहर व अस्वच्छ परिसरामध्ये त्यांचाही सतत संपर्क असतो

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस हे पंढरपूर येथे आले असता त्यांच्यात घरी त्यांचे वास्तव्य असते आणि त्यांची नेहमी भेट होत असते पंढरपूर शहरांमध्ये पण त्यांचा भरपूर मोठा असा मित्रपरिवार त्यांनी गोळा केला आहे व त्यांच्या स्वभाव सर्व लोकांना सोबत घेऊन जाण्याचा आहे त्यामुळे त्यांच्या भविष्या मध्ये त्यांच्या ह्या स्वभावाचा व भागातील लोकांना नक्कीच फायदा होणार आहे तरी शिवसेनेने अशा राजकारणातील नवीन चेहऱ्याला संधी द्यावी अशी मागणी या भागातील नागरिक शिवसैनिक करत आहेत

